उल्हासनगर महानगरपालिका

मालमत्ता कर विभाग
मुख्य कार्यालय, तळमजला, उल्हासनगर-४२१ ००३ जिल्हा ठाणे, महाराष्ट्र
Tel No:- 95251-2720116/125 Ext.No.238 Fax No.95251-2720104

जा क्र उमपा/कर विभाग/यु-५/१२१/२०२२ दिनांक १२ ऑक्टोबर, २०२३

संदर्भ- १) विशेष नोटीस क्र उमपा/कर विभाग/यु ५/१२१ दिनांक २३/०३/२०२३
२) श्री. मनोज डी जेस्वानी यांनी दिनांक ०३/०१/२०२३
रोजी दाखल केलेली हरकत (ना.सु.केंद्र टोकन नं ४१२०२३०००००६३३१)
३) जा.क्र.उमपा/कर विभाग/१२१ दिनांक ३१/०५/२०२३ रोजीची सुनावणी नोटीस
४) सुनावणी दिनांक ०७/०६/२०२३

## प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. ३६बीओ००६५३३१०५ (बॅरेक नं. १०१४ जवळ, सेक्शन-२३, दसेर मैदानच्या मागे, उल्हासनगर-३) अन्वये नोंद असलेल्या मिळकतीकरीता कर निर्धारणासंबंधी संदर्भ क्र १ अन्वये विशेष नोटीस बजावण्यात आली आहे.

उक्त नोटीसच्या अनुषंगाने संदर्भ क्र. २ अन्वये मालमत्ता क्र. ३६बीओ००६५३३१०५ अन्वये मनोज डी जेस्वानी यांचे नावे नोंद असलेल्या मिळकतीचे बांधकाम प्रकार विटा पत्रे असा आहे परंतु त्यांना टियर गरडर नुसार विषेश नोटीस बजावण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर विषेश नोटीस रद्द करण्यात यावी. व विटा पत्रे बांधकाम वापरानुसार कर बिल देण्यात यावे अशी हरकत दाखल केली आहे.

उक्त हरकतीच्या अनुषंगाने संदर्भ क्र ३ नुसार संबंधितास दिनांक ०७/०६/२०२३ रोजी सुनावणीस उपस्थित राहणेबाबत नोटीस बजावण्यात आली आहे.

दिनांक ०७/०६/२०२३ रोजी सुनावणीस मनोज डी जेस्वानी हे हजर असुन मालमत्ता क्र. ३६बीओ००६५३३१०५ अन्वये नोंद असलेल्या मिळकतीचे बांधकाम प्रकार विटा पत्रे असा आहे. परंतु त्यांना टियर गरडर नुसार विषेश नोटीस बजावण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर विषेश नोटीस रद्द करण्यात यावी. व विटा पत्रे बांधकाम वापरानुसार कर बिल देण्यात याव असे त्यांचे लेखी अर्जाद्वारे निवेदन सादर केले आहे.

त्याअनुषंगाने मालमत्ता क्र. ३६बीओ००६५३३१०५ अन्वये नोंद असलेल्या मिळकतीची तपासणी केली असता व कर निरीक्षक व मे. कोल्ब्रो यांचे प्रतिनिधी यांनी प्रत्यक्ष पाहणी केल्यानुसार मालमत्ता क्र. ३६बीओ००६५३३१०५ या मिळकतीचा बांधकाम प्रकार विटा पत्रे नुसार असल्याचे दिसुन आले.

सबब मनोज डी जेस्वानी यांनी दाखल केलेली हरकत मान्य करण्यात येत आहे. उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. ३६बीओ००६५३३१०५ अन्वये बजावण्यात आलेली विशेष नोटीस रद्द करुन प्रत्यक्ष जागेवरील मोजमाप व बांधकाम प्रकार, वापराप्रमाणे विषेश नोटीसची बजावणी करुन वर्ष २०२३-२०२४ करीता कर बिल बजावणेकरीता शिफारस करण्यात आली आहे.

यास्तव मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे

## आदेश

१) श्री. मनोज डी जेस्वानी गुर्बानी यांनी दाखल केलेली हरकत मान्य करण्यात येत आहे.

२) उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. ३६बीओ००६५३३१०५ अन्वये नोंद असलेल्या मिळकतीसंदर्भात बजावण्यात आलेली विशेष नोटीस रद्द करुन प्रत्यक्ष जागेवरील मोजमाप, बांधकाम प्रकार व वापराप्रमाणे विषेश नोटीसची बजावणी करुन वर्ष २०२३-२४ करीता कर बिल जारी करावे.

(प्रियंका राजपूत)
उप आयुक्त (कर)
उल्हासनगर महानगरपालिका

प्रति,
१) मे. कोल्ब्रो ग्रुप, नागपुर
२) श्री. मनोज डी जेस्वानी रा- बॅरेक नं. १०१४ जवळ, सेक्शन-२३, दसेर मैदानच्या मागे, उल्हासनगर-३